# Vadhvan Port Crosses Key Milestones; Project Set to Progress in Full Swing

**Mumbai, June 24th, 2026:** The Vadhvan Port Project Ltd., 13th major port of India, has crossed another significant milestone, paving the way for accelerated execution of works across the project area. In a major development, the Hon'ble Bombay High Court has granted clearance for the removal of the mangrove patches located within the approach area of the near-shore reclamation zone, thereby resolving one of the key pending issues affecting project implementation.

With this clearance, the project is now poised to move ahead at full pace. Major contracts relating to the construction of the breakwater and near-shore reclamation have already been awarded. Simultaneously, agencies such as the National Highways Authority of India and Indian Railways have commenced engineering and preparatory activities for external connectivity infrastructure.

The service road works are expected to gather momentum immediately, with full-scale activities likely to commence shortly. In addition, contracts for water supply infrastructure have already been awarded, while temporary power supply arrangements are nearing completion.

Land acquisition activities are also progressing rapidly with active support from the Government of Maharashtra and various State agencies. With critical approvals, connectivity works, utility infrastructure, and land acquisition moving forward in parallel, the Vadhvan Port Project is now firmly positioned for full-scale implementation.

Conveying these developments, Shri Gaurav Dayal, IAS, Chairman and Managing Director of Vadhvan Port Project Ltd. (VPPL), stated

that the clearances and parallel progress across multiple workstreams mark the beginning of a new phase for the project. He noted that the momentum achieved in approvals, infrastructure development, and stakeholder coordination has strengthened confidence in the timely execution of the project and its commissioning within the targeted timeframe.

These clearances mark the beginning of a new phase for the project, reinforcing the commitment of all stakeholders towards developing Vadhvan Port into a world-class maritime gateway and a key driver of India's future trade and logistics growth.

*****

**About VPPL:**

Vadhvan Port Private Limited (VPPL) is the 13th major port of India, a special purpose vehicle (SPV) formed between Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) and the Maharashtra Maritime Board (MMB). Strategically located in Palghar district, near Dahanu, Maharashtra, VPPL is poised to be among the top 10 ports globally. The foundation stone for the port was laid on August 30th, 2024, by the Hon'ble Prime Minister of India, Shri Narendra Modi.

Committed to sustainability, VPPL will be 100% green from inception, ensuring minimal environmental impact. The port is set to enhance trade efficiency with the capacity to handle 24 million TEUs, stimulate economic growth, and contribute to regional development. Through initiatives like the Vadhvan Port Skilling Program, VPPL focuses on empowering local communities.

**Visit our website and social media to learn more:**

VPPL Website: https://vadhvanport.in/

X - VadhvanPort

Facebook - Vadhvan Port Project Ltd

Instagram - vadhvanport

LinkedIn - Vadhvan Port Project Ltd

**For media enquiries, please contact:**
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +919920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

# वाढवण बंदर प्रकल्पाने पार केले निर्णायक टप्पे; उभारणीच्या कामांना आता वेग

**मुंबई, 24 जून 2026:** देशातील 13वे प्रमुख बंदर असलेल्या वाढवण बंदर प्रकल्पाने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून, त्यामुळे प्रकल्प क्षेत्रातील विविध कामांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या संदर्भात महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून, मुंबई उच्च न्यायालयाने किनारपट्टीलगतच्या भराव (नियर शोर रिक्लेमेशन) क्षेत्राच्या प्रवेश मार्गात येणाऱ्या खारफुटी (मॅंग्रोव्ह) पट्ट्या हटविण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसमोरील प्रमुख प्रलंबित अडथळ्यांपैकी एक अडथळा दूर झाला असून, आगामी कामांना वेगाने पुढे नेण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रकल्पाच्या पुढील टप्प्यातील कामे नियोजित नियोजनानुसार राबविण्यास मदत होणार असून, वाढवण बंदराच्या उभारणीच्या प्रक्रियेला नवी गती मिळणार आहे.

या मंजुरीमुळे वाढवण बंदर प्रकल्पाच्या कामांना आता पूर्ण वेगाने पुढे नेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्पातील ब्रेकवॉटर उभारणी तसेच किनारपट्टीलगतच्या भराव (नियर शोर रिक्लेमेशन) कामांशी संबंधित प्रमुख कंत्राटे यापूर्वीच प्रदान करण्यात आली आहेत. त्याचबरोबर, बाह्य दळणवळण सुविधांच्या उभारणीसाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आणि भारतीय रेल्वे यांसारख्या संस्थांनी अभियांत्रिकी व पूर्वतयारीची कामे सुरू केली आहेत. या सर्व घडामोडींमुळे प्रकल्पाच्या विविध घटकांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळणार असून, वाढवण बंदराच्या उभारणीची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे पुढे सरकणार आहे.

तसेच सेवा मार्गाच्या उभारणीच्या कामांना तात्काळ गती मिळण्याची अपेक्षा असून, लवकरच या कामांना पूर्ण स्वरूपात प्रारंभ होणार आहे. दरम्यान, प्रकल्पासाठी आवश्यक जलपुरवठा यंत्रणेच्या उभारणीची कंत्राटे यापूर्वीच देण्यात आली आहेत. तसेच, तात्पुरत्या वीजपुरवठ्यासाठी आवश्यक पायाभूत व्यवस्था पूर्णत्वाच्या मार्गावर असून, त्या लवकरच कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र शासन तसेच विविध राज्यस्तरीय यंत्रणांच्या सक्रिय सहकार्यामुळे भूसंपादनाची प्रक्रियादेखील वेगाने पुढे सरकत आहे. आवश्यक मंजुरी, बाह्य दळणवळण सुविधांची उभारणी, मूलभूत उपयुक्तता सेवा (युटिलिटी इन्फ्रास्ट्रक्चर) आणि भूसंपादन ही सर्व कामे समांतरपणे प्रगतीपथावर असल्याने वाढवण बंदर प्रकल्प आता पूर्ण क्षमतेने अंमलबजावणीच्या टप्प्यात प्रवेश करण्यासाठी सज्ज झाला आहे. या सर्व घडामोडींमुळे प्रकल्पाच्या उभारणीला भक्कम आधार मिळाला असून, देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी बंदर प्रकल्पांपैकी एक असलेल्या वाढवण बंदराच्या विकासाला आता अधिक वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

या घडामोडींविषयी माहिती देताना वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल, भा. प्र. से., यांनी सांगितले की, आवश्यक मंजुरी मिळणे आणि प्रकल्पाशी संबंधित विविध कामांमध्ये समांतरपणे होत असलेली प्रगती ही प्रकल्पासाठी नव्या पर्वाची सुरुवात आहे. मंजुरी प्रक्रिया, पायाभूत सुविधांच्या उभारणीतील प्रगती तसेच विविध

भागधारकांमधील प्रभावी समन्वय यांमुळे प्रकल्पाच्या वेळेत अंमलबजावणीबाबतचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. नियोजित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करून तो कार्यान्वित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या मंजुऱ्यांमुळे वाढवण बंदर प्रकल्पाच्या उभारणीला नवे बळ मिळाले असून, प्रकल्पाच्या विकासातील एका महत्त्वपूर्ण नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. वाढवण बंदराला जागतिक दर्जाच्या सागरी पायाभूत सुविधांनी सुसज्ज बंदर म्हणून विकसित करण्यासाठी तसेच भारताच्या भविष्यातील व्यापार आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राच्या प्रगतीला गती देणारे महत्त्वपूर्ण केंद्र निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा आणि भागधारकांची वचनबद्धता यामुळे अधिक दृढ झाली आहे.

*****

**व्हीपीपीएल संदर्भात माहिती:**

वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (VPPL) हे देशाचे १३वे मोठे बंदर असून, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड (MMB) यांच्या संयुक्त भागीदारीत स्थापन करण्यात आलेले एक विशेष उददिष्ट असलेले कंपनी रूपातील उपक्रम आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळ वसलेले हे बंदर जागतिक स्तरावर आघाडीच्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवण्यास सक्षम आहे. ३० ऑगस्ट २०२४ रोजी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या बंदराच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक क्षण घडला.

निसर्गपूरकतेला प्राधान्य देत, वाढवण बंदर हे शंभर टक्के हरित तत्त्वावर आधारित असणार आहे, जे पर्यावरणावर कमीत कमी परिणाम करत अधिक कार्यक्षमतेने काम करेल. २४ दशलक्ष टीईयू (TEU) माल हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर देशाच्या व्यापार कार्यक्षमतेला गती देणार आहे. या माध्यमातून आर्थिक प्रगतीला चालना मिळेल आणि परिसराचा सर्वांगीण विकास होईल. वाढवण पोर्ट कौशल्य कार्यक्रमांसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक समुदाय सशक्त करण्यावर वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड विशेष भर देत आहे.

**अधिक जाणून घेण्यासाठी आमच्या संकेतस्थळावर आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

व्हीपीपीएल संकेतस्थळ - https://vadhvanport.in/

फेसबुक - Vadhvan Port Project Ltd

X- VadhvanPort

इंस्टाग्राम - vadhvanport

लिंक्डइन - Vadhvan Port Project Ltd

**माध्यम प्रतिनिधींनी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:**

अंबिका सिंग,

वरिष्ठ व्यवस्थापक (मार्केटिंग), जेएनपीए

मोबाईल क्र. : +919920372677

ईमेल: ambikasingh@jnport.gov.in